[ इंग्रजीमध्ये टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठीमध्ये अनुवाद ]

[१९९६] १ एस.सी.आर. १०३०

करम सिंग

विरुद्ध

पंजाब राज्य आणि इतर

जानेवारी २९, १९९६

[न्या. के. रामास्वामी आणि न्या. जी. बी. पटनाईक]

सेवा नियम –

पंजाब पोलीस नियम - पोलीस कॉन्स्टेबल – आयपीसी च्या कलम 323 अंतर्गत दोषी ठरल्यानंतर बडतर्फी आणि परिविक्षेवर मुक्तता – पुनःस्थापित करण्यासाठी युक्तिवाद – ची फेटाळली – असा निर्णय दिला की, तो शिस्तबद्ध दलाचा सदस्य असल्याने त्याला पुनःस्थापित चा युक्तिवाद नाकारणे अधिकाऱ्यांना योग्य वाटले—तथापि, बडतर्फी चे रूपांतर सेवेतून काढून टाकणे यामध्ये झाले.

भारत संघराज्य विरुद्ध बक्षी राम [१९९०] २ एससीसी ४२६, लागू होते असे मानले.

शंकर दास वि. भारत संघराज्य, [१९८५] २ एससीसी ३५८, स्पष्ट केले आणि लागू होत नाही असे मानले.

कॉलेजिएट एज्युकेशनचे उपसंचालक (प्रशासन) वि. एस. नागूर मीरा, [१९५५] ३ एससीसी ३७७ लागू होत नाही असे मानले.

दिवाणी अपील अधिकारिता : विशेष अनुमती याचिका (दि) क्रमांक ९०३/१९९६.

पंजाब व हरियाणा उच्च न्यायालयाच्या दिनांक ८.८.९५ रोजी एल.पी.ए. ६५७/१९९५ मध्ये पारित केलेल्या न्यायनिर्णय व आदेशावरून.

याचिकाकर्त्यातर्फे आर. के. कपूर, पी. वर्मा, एस. के. श्रीवास्तव आणि अनिस अहमद खान.

न्यायालयाचा आदेश पुढीलप्रमाणे पारित करण्यात आला :

आम्ही याचिकाकर्त्याच्या विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकले आहे. मान्य केलेली वस्तुस्थिती अशी आहे की, याचिकाकर्ते आणि इतरांवर आयपीसीच्या कलम 302 सह कलम 34 तसेच आयपीसीच्या कलम 323 आणि 324 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. सत्र न्यायालयाने याचिकाकर्ते आणि इतरांना दोषी ठरवले, परंतु अपीलामध्ये उच्च न्यायालयाने कलम 302 सह कलम 34 आणि कलम 324 अन्वये याचिकाकर्त्याची शिक्षा रद्दबातल केली, परंतु, कलम ३२३ अन्वये सुनावण्यात आलेली शिक्षा कायम ठेवली आणि त्याला परिविक्षेवर मुक्त केले. त्यानंतर, याचिकाकर्त्याने सेवेत पुनःस्थापित करण्याची मागणी केली. पंजाब पोलीस नियम च्या परंतुक १६.२ मधील तरतुदींच्या अनुषंगाने, अधिकाऱ्यांनी याचिकाकर्त्याला यापूर्वीच बडतर्फ केले

असल्याने त्यांना सेवेत पुन्हा रुजू करण्यास नकार दिला. त्याच्या अचूकतेला त्यांनी आव्हान दिले. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने मात्र एलपीए क्रमांक ६५७/९५, दिनांक ८.८.१९९५ च्या आदेशाने तो फेटाळून लावला. त्यामुळे ही विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आली.

याचिकाकर्त्याचे विद्वान वकील श्री. कपूर यांनी असा युक्तिवाद केला आहे की, याचिकाकर्त्याची आयपीसी च्या कलम ३०२ आणि ३२४ अंतर्गत गुन्ह्याच्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे आणि कलम ३२३ अन्वये गुन्ह्यासाठी त्याला परिविक्षेवर सोडण्यात आले आहे, त्यामुळे त्याच्या पुनःस्थापनेच्या मार्गात कोणताही अडथळा आहे, असे म्हणता येणार नाही आणि की, त्यामुळे अधिकारी आणि उच्च न्यायालयाचे मत कायद्याने वैध नाही. आम्हाला या वादात कोणतेही बळ दिसत नाही. हे खरे आहे की शंकर दास वि. भारत सरकार, [1985] 2 एससीसी 358 मध्ये या न्यायालयाने असा निर्णय दिला होता की, प्रोबेशन ऑफ ऑफेंडर्स अॅक्ट, 1958 च्या कलम 12 अन्वये निर्दोष मुक्तता आणि परिविक्षेवर सुटल्यानंतर अधिकाऱ्यांना प्रत्येक प्रकरणातील तथ्यांवर विचार करण्याचा अधिकार आहे की त्यातील अपीलकर्त्याला सेवेत पुन्हा रुजू केले जाऊ शकते की नाही. हे लक्षात घ्यायला हवे की, अपराधसिद्धि हा त्याचा एक भाग आहे आणि परिविक्षेवर सुटका हा दुसरा भाग आहे. नंतरचा भाग गुन्हेगाराला ज्या कालावधीसाठी प्रोबेशन मंजूर करण्यात आले होते, त्या कालावधीत चांगले वर्तन दाखवल्यावर शिक्षा न भोगणे, हे सहाय्यभूत करते. समजा परिवीक्षा कालावधीत त्याने दुसरा गुन्हा केला तर त्याची पपरिवीक्षा संपुष्टात येते आणि तो शिक्षा भोगण्यास पात्र ठरेल. एखाद्या सरकारी कर्मचाऱ्याला जेव्हा एखाद्या गुन्ह्यासाठी दोषी ठरवले जाते, तेव्हा त्याच्या

गैरवर्तनामुळेच त्याला बडतर्फ केले जाते. एका व्यक्तीचा मृत्यू आणि सदर व्यक्तीस जखमी करण्यात सहभाग असल्याच्या कारणावरून या प्रकरणात त्याला दोषी ठरवण्यात आले आहे. खुनाच्या गुन्ह्यातून त्याची निर्दोष मुक्तता झाली असली तरी तो संबंधित वेळी शिपाई या पदावर असल्याने व दलाचा शिस्तप्रिय सदस्य असल्याने त्याने गुन्ह्यात भाग घेणे अपेक्षित नव्हते; त्याऐवजी त्यांनी गुन्हा घडणे रोखणे अपेक्षित होते. शंकर दास यांच्या प्रकरणात (उपरोल्लेखित) असा निर्णय देण्यात आला होता की, निर्णय घेण्यापूर्वी संधी देण्यात आली नसल्याने सेवेतून काढून टाकणे हे कायद्यानुसार वैध नाही.

भारत संघराज्य विरुद्ध बक्षी राम, [१९९०] २ एससीसी ४२६ या खटल्यात या न्यायालयाने जरी त्याची परिवीक्षावर सुटका झाली असली तरी, प्रोबेशन ऑफ ऑफेंडर्स अॅक्टच्या कलम १२ चा प्रभाव आणि सरकारी कर्मचाऱ्याला काढून टाकण्याच्या अधिकार आणि अपराधसिद्धि ही अनहर्त आहे, या बाबींचा विचार केला. न्यानिर्णयाच्या परिच्छेद ११ मध्ये नमूद केल्याप्रमाणे अनेक उच्च न्यायालयांनी दिलेल्या सातत्यपूर्ण युक्तिवादाला मान्यता दिल्यानंतर या न्यायालयाने असा निर्णय दिला की, जरी, कलम १२ अपचाऱ्यास अधिकार देते तरी त्यामुळे गुन्हा संपत नाही आणि तो शिक्षेशी जोडलेली अनहर्ता ठरेल. सेवेतून काढून टाकण्याची शिक्षा ठोठावताना त्या घटकाचा विचार करण्याचा अधिकार अधिकाऱ्यांना असेल. अशा परिस्थितीत, सेवेतून बडतर्फ करण्याच्या शिक्षेत बदल करून सेवेतून काढून टाकण्याच्या एका शिक्षेपैकी एक शिक्षा करण्यात आली.

कॉलेजिएट एज्युकेशनचे उपसंचालक (प्रशासन) विरुद्ध एस. नागूर मीरा, [१९९५] ३ एससीसी ३७७ या खटल्यात, या न्यायालयाच्या दुसऱ्या खंडपीठाने या वादाचा विचार केला आहे की, जेव्हा

आरोपीला फौजदारी न्यायालयाने दोषी ठरवले असेल, तेव्हा शिस्तपालन प्राधिकरण अद्याप खटल्याच्या निकालाची वाट पाहेल की नाही. आरोपीला दोषी ठरविल्यानंतर घटनेच्या अनुच्छेद ३११ (२) मधील तरतुदीनुसार कारवाई करणे हा आधार आहे, जे अभियोग पक्षाच्या खटल्याच्या अंतिम निकालाच्या अधीन असेल, असे मत या न्यायालयाने व्यक्त केले. जर प्रकरणाचा निकाल आरोपीच्या बाजूने लागला आणि तो सन्मानाने निर्दोष सुटला तर अधिकाऱ्यांना काढून टाकण्याच्या आदेशाचा पुनर्विचार करणे आवश्यक आहे. हे गुणोत्तर देखील याचिकाकर्त्याला सहाय्यभूत ठरत नाही कारण त्याला यापूर्वीच कलम 323 अंतर्गत दोषी ठरवण्यात आले आहे आणि त्याला प्रोबेशनवर सोडण्यात आले असले तरी ती अनहर्ता आहे. अशा परिस्थितीत, बक्षी राम प्रकरणातील गुणोत्तर या प्रकरणातील वस्तुस्थितीला लागू होईल. त्या दृष्टीने याचिकाकर्ते शिस्तबद्ध पोलिस दलाचे सदस्य असल्याने त्यांना सेवेत पुनःस्थापित करणे नाकारणे अधिकाऱ्यांना रास्त होते. तथापि, आम्ही बडतर्फीच्या शिक्षेचे रूपांतर सेवेतून काढून टाकण्याच्या शिक्षेपैकी एका शिक्षेत करतो.

त्यानुसार, वि.अ.या. फेटाळण्यात येत आहे.

जी.एन. याचिका फेटाळली

**x-x-x-x-x-x-x**

अस्वीकरण

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्याय निर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

**x-x-x-x-x-x-x**